जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १९ दिनांक - ०६/०१/२०२४**

सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर

## बक्सकॉईन या क्रिप्टोकरन्सी मध्ये गुंतवणुक करण्यास सांगुन त्याद्वारे अधिक नफा मिळवुण देण्याचे अमिष दाखवुन आर्थिक फसवणुक करणा-या आरोपीस केले जेरबंद

सायबर पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हयातील आरोपीतांनी वेळो-वेळी वेग-वेगळ्या ठिकाणी आयोजित केलेल्या सेमिनार मध्ये फिर्यादी यांना तसेच इतर गुंतवणुकदारांना जादा परतावा देण्याच्या बहाण्याने बक्सकॉईन या क्रिप्टोकरन्सीमध्ये तसेच मल्टीलेव्हल मार्केटिंगसारख्या प्लॅनमध्ये गुंतवणुक करावयास सांगुन आरोपीतांनी चालू केलेले प्लॅटफॉर्म, प्लॅन्स्, वेबसाईट, पोर्टल हे जाणीवपुर्वक फसवणूक करण्याच्या उद्देशाने कालांतराने बंद करुन फिर्यादी तसेच त्यांचे इतर ०७ सहकारी गुंतवणुकदार यांना गुंतवणुक केलेल्या रकमेवर कोणताही परतावा न देता त्यांची एकुण रक्कम ८४,३४,६४१.७६/ रुपये ची आर्थिक फसवणूक केली म्हणुन फिर्यादी यांनी दि. २७/११/२०२१ रोजी फिर्याद दिल्याने सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे **गु.रजि.नं. ५४/२०२१, भा.दं.वि.कलम ४०६, ४२०, ३४ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कायदा २००० कलम ६६ डी सह एम.पी.आय.डी. क. ३ व ४** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयामध्ये यापुर्वी आरोपी नामे **गणेश शिवकुमार सागर, वय- ४७ वर्षे, रा. फ्लॅट नं. ए-१०४, पहिला मजला, एस.बी.युथ, सीजीएचएस, प्लॉट नं. ६ बी, सेक्टर २, फेज १, द्वारका, गव्हर्मेंट स्कुल शेजारी, नवी दिल्ली- ११००७५** यास दिल्ली येथुन अटक करण्यात आली असुन त्याचे विरुद्ध मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आलेले आहे. नमुद गुन्हयातील बिटसोलाईव्हज प्रा.लि. कंपनी, दुबई यामधील डायरेक्टर यांनी वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित केलेल्या सेमिनार मध्ये बक्सकॉईन या क्रिप्टोकरन्सीमध्ये तसेच मल्टीलेव्हल मार्केटिंगसारख्या प्लॅनमध्ये गुंतवणुक करावयास सांगुन आरोपीतांनी चालू केलेले प्लॅटफॉर्म, प्लॅन्स्, वेबसाईट, पोर्टल हे जाणीवपुर्वक फसवणूक करण्याच्या उद्देशाने कालांतराने बंद करुन फिर्यादी तसेच त्यांचे इतर ०७ सहकारी गुंतवणुकदारांची मोठ्या रकमेची फसवणुक केली असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे. नमुद गुन्ह्यामध्ये आरोपी नामे **प्रशांत कुमार कमलेश भाई ब्रम्हभट, वय- ३४ वर्षे, सध्या रा. ४०४, ॲन्डालुस प्लाझा, मंखुल, बुर दुबई, कायमचा पत्ता- हाऊस नं. २२/२११, मारुती धाम, जीआयडीसी, मकरपुरा, वडोदरा, गुजरात** यास आर्थिक गुन्हे शाखा, सुरत शहर, गुजरात येथील डीसीबी पोलीस स्टेशन, **गु.र.नं. ११२१००१५२२००७५/२०२२** या गुन्हयामध्ये अटक केली असुन नमुद आरोपी हा इकडील दाखल गुन्ह्यात पाहिजे आरोपी असुन त्यास मध्यवर्ती कारागृह, लाजपोर, सुरत, गुजरात येथुन दि. ०५/०१/२०२४ रोजी सदर गुन्ह्यामध्ये ताबा घेऊन दिनांक ०६/०१/२०२४ रोजी १०:२१ वा. अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीतास आज रोजी मा.न्यायालयासमोर हजर केले असता अटक आरोपीस दि. ०९/०१/२०२४ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक, चंद्रशेखर सावंत हे करीत आहेत.

सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर यांचेकडून आवाहन करण्यात येत आहे की, वर नमुद Bitsolives Pvt.Ltd या कंपीनीच्या नावाचा वापर करून गुंतवणुक करण्याचे सांगुन कोणाची फसवणुक झाली असल्यास त्यांनी सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर यांचेशी संपर्क करावा.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त, श्री. रितेश कुमार, मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे,श्री. रामनाथ पोकळे, मा.पोलीस उपआयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे, श्री.विक्रांत देशमुख, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे श्री.आर.एन.राजे, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती मिनल सुपे-पाटील, पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत, पोउपनि प्रमोद खरात, सपोउपनि संदेश कर्णे, पोलीस अंमलदार राजेश केदारी, अश्विन कुमकर, प्रविणसिंग राजपुत, वैभव माने, दिनेश मरकड, शिरीष गावडे, निखील पासलकर सर्व नेमणुक सायबर पोलीस स्टेशन यांनी केला असून तपासामध्ये उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.